महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**
पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर § ४४० ०२२
दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U८५३००PN२०१९NPL१८७४०५ ई-मेल: mahajyotingp@gmail.com

जावक क्र.महाज्योती/PhD/२०२४/२२५१ दि.०४.०९.२०२४.

## परिपत्रक

**विषय : पीएचडी अधिछात्रवृत्ती-२०२३ योजनेअंतर्गत कागदपत्रे पडताळणीकरिता शेवटची संधी उपलब्ध करून देणेबाबत.**

पीएचडी अधिछात्रवृत्ती-२०२३ योजनेअंतर्गत अर्ज केलेल्या उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी ही दि.०७.०८.२०२४ ते दि.२२.०८.२०२४ या दरम्यान पार पडलेली आहे.मात्र जे विद्यार्थी नेमून दिलेल्या दिवशी या कार्यालयात येऊन कागदपत्रे पडताळणी करू शकलेले नाहीत अश्या विद्यार्थ्यांनी या कार्यालयाच्या Call Center वर आमची कागदपत्रे पडताळणी करून घ्यावी म्हणून या कार्यालयाकडे विनंती केलेली आहे.

पीएचडी अधिछात्रवृत्ती-२०२३ योजनेअंतर्गत अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये या करिता कागदपत्रे पडताळणीकरिता शेवटची संधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय महाज्योती प्रशासनाने घेतलेला आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप कागदपत्रे पडताळणी केलेली नाही त्यांना शेवटची संधी देण्यात येत आहे, या नंतर कोणतीही संधी देण्यात येणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. तसेच या आधी कागदपत्रे पडताळणी करिता देण्यात आलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करून **महाज्योती कार्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२ या पत्त्यावर मूळ कागदपत्रांसहीत दि.०९.०९.२०२४ रोजी सकाळी ११.०० ते ५.०० या** दरम्यान कागदपत्रे पडताळणी करिता उपस्थित रहावे.

स्वाक्षरीत/-

(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व
प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर.